


## जात्यावरच्या ओव्या......

दिवाळसणाला
मन, तन आनंदले
देवा युगापासुन
तुच मला रे तारले ||३४६||


दिवाळसणाला
काय वर्णावा आनंदु
दास देह संसारात
तुला ठायी ठायी वंदु ||३४७||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## संगीत देवबाभळी : एक थरारून सोडणारा नाट्यानुभव

ज्योतिर्मय साहित्य

देवबाभळी असे निरस नाव असलेलं एखादं नाटक असेल असं कधी वाटलं नव्हतं, त्याहून आश्चर्याची गोष्ट म्हणजे ते संगीत नाटक असेल आणि त्याच्याही पुढची गोष्ट म्हणजे तो एक थरारून टाकणारा नाट्यानुभव असेल असंही कधी वाटले नव्हते. पण म्हणतात ना ट्रुथ इज स्ट्रानगर डॅन फिकशन. तसंच काहीसं माझं या नाटकाच्या बाबतीत झालं आहे. पुण्यातील वास्तव्यात हे नाटक पाहण्याचा योग आला आणि जे पाहिले त्यामुळे भरून पावलो. हे नाटक पाहिलं नसतं तर एका चांगल्या आनंदाला निश्चितच मुकलो असतो.








खरं तर हे नाटक आहे संत तुकारामांची पत्नी आवली आणि विठूरायाची पत्नी देवी रुख्मिणी यांच्यावर. या नाटकात केवळ या दोघींच्याच भूमिका आहेत. तुकाराम महाराज आणि विठ्ठल यांचा उल्लेख वारंवार झाला तरी या नाटकात पात्र म्हणून प्रत्यक्षात रंगमंचावर ते कधीच येत नाहीत पण ते अवघे नाटक व्यापून उरले आहेत. त्यांचे अस्तित्व सतत जाणवत राहते. मग प्रश्न असा आहे की देवबाभळी हे नाव आले तरी कसे ?

यासाठी नाटकाचे लेखक आणि दिग्दर्शक असलेल्या प्राजक्त देशमुख यांना त्याचे श्रेय द्यावे लागेल. तुकारामांची पत्नी आवली हिच्या पायात बाभळीचा काटा मोडतो. तो काटा काढण्यासाठी कोण मदत करतं तर प्रत्यक्ष विठुराया. विठुरायाने पायातला काटा काढला तरी पायातल्या वेदनेची आणि जखमेची ठसठस घेऊन आवली नाटकभर वावरते. विठुराया केवळ तेवढं करून थांबत नाही, तर तिच्या मदतीला आपली पत्नी रुख्मिणी हिला पाठवतो. त्यावेळी आवली पोटुशी असते. देवबाभळीचा काटा मोडणं हे खरं तर निमित्त ! पण या निमित्ताने विठुरायाचे आपल्या भक्तांवरील प्रेम दिसते. या निमित्तानेच रुख्मिणी आवलीच्या घरी येते. या दोघींचंही दुःख कुठेतरी एकसमान आहेत. पण त्या दोघींच्या मनातील वेदना, स्त्री सुलभ भावना आणि आपल्या पतीबद्दल असलेलं प्रेमही यानिमित्ताने दिसून येतं. या सगळ्या गोष्टींना कारण ठरते ती देवबाभळी !

नाटकाचा पडदा उघडतो आणि शेणानं आपलंअंगण सारवणारी आवली दृष्टीस पडते. सारवताना ती गात असते. सकाळचे प्रसन्न वातावरण दृष्टीला पडते. स्वयंपाकघरातून डोकावणारी सूर्यकिरणे दिसतात. चुलीतला धूर दृष्टीस पडतो. आवली भाकऱ्या करते आणि भंडाऱ्याच्या डोंगरावर असणाऱ्या आपल्या पतीला म्हणजेच तुकाराम बुवांना त्या नेऊन देत असते. तुकारामबुवांना हाक मारताना आवो आवो... अशा तिच्या आर्त हाका हृदयाला स्पर्शून जातात. डोंगर उतरताना आवलीच्या पायात बाभळीचा काटा घुसतो आणि ती खाली कोसळते. पुढचं तिला आठवत नाही.

(क्रमशः)



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## मायाब्रम्हनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

नमस्कार

समर्थांचा हा दासबोधाचा पाचवा समास अभ्यासत असताना मला शाळेची आठवण आली कारण शाळेच्या अभ्यासक्रमात परिक्षेत हमखास येणारा प्रश्न म्हणजे दोन गोष्टींची तुलना करा? असाच हा ''मायाब्रम्हनिरूपण''समास आहे. संपूर्ण समासात माया व ब्रम्ह यांची तुलना अभ्यासायला मिळते. कशी ते आता पाहूया!

माया व ब्रम्ह ही कशी असतात?

१) ब्रम्ह निर्गुण निराकार तर माया सगुण साकार आहे. ब्रम्ह हे अनादीअनंत आहे तर माया परिमित आहे.

२) ब्रम्ह निर्मळ, निश्चल तर माया चंचल, चपळ आहे. ब्रम्ह अमर्यादित आहे तर माया मर्यादित आहे.

३) ब्रम्ह दिसत नाही, तर माया दिसते. ब्रम्ह भासत नाही तर माया भासते. ब्रम्ह कल्पांताच्या काळी सुद्धा नाश पावत नाही तर माया नाश पावते.

४) ब्रम्ह निर्माण होत नाही, तर माया निर्माण होते. ब्रम्ह क्षय पावत नाही पण माया मात्र कधीना कधी क्षय पावते. ब्रम्ह अज्ञानी जीवाला आवडत नाही, तर माया अज्ञानी जीवाला आवडते.

५) ब्रम्हाला जन्म मरण नाही, पण मायेला जन्म मरण आहे. ब्रम्ह धारणेत धरता येत नाही, तर माया धारणेत धरता येते.

६) ब्रम्ह तुटतफुटत नाही ते अविनाशी व अवीट आहे. तर माया तुटतेफुटते व अविनाशी असल्याने विटते कुचकामी होते. मायेचा भास हा वरवरचा पण असु शकतो.


७) ब्रम्ह विकारापासून मुक्त आहे तर माया विकारयुक्त आहे. ब्रम्ह काहीच करत नाही तर माया सर्व काही करते. ब्रम्ह रूपरहीत आहे तर मायेला रूप आहे ती वेगवेगळ्या रूपात दिसून येते. माया नाना रूप धारण करू शकते.

८) ब्रम्ह शाश्वत व एकच आहे तर माया पंचभूतात्मक, अशाश्वत, अनेकपणाने भरलेली आहे. जे जीव आत्मानात्मविवेकी असतात तेच मायेचे व ब्रम्हाचे खरें रूप जाणतात.

९) ब्रम्ह विशाल, सारसर्वस्व, स्थलातीत आहे. तर माया लहान,सारहीन व स्थलयुक्त आहे.मायेमध्ये अलीकडे, पलीकडे असा स्थलयुक्त भेदभाव आहे.

१०) या संपूर्ण विश्वात माया पसरलेली आहे.. त्यामुळे ब्रम्ह झाकले गेले आहे. परंतु साधुसंत मायेच्या पसाऱ्यातून तें शुद्ध ब्रम्ह स्वरूप निवडून घेतात.

(क्रमशः)



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## नामाविषयी शुद्ध भाव आवश्यक

ज्योतिर्मय साहित्य

ईश्वर सर्वांचा उत्पन्नकर्ता आहे, रक्षणकर्ता आहे, तसेच संहारकर्ताही आहे. परंतु तरी त्याला न्यायी आणि प्रेमी म्हणतातच, कारण तो नि:स्वार्थी आहे. म्हणजे प्रेम हे नि:स्वार्थातच असते. आपल्याला खरे म्हटले म्हणजे आपला स्वार्थच नडतो. आपला स्वार्थ प्रेमाच्या आड येतो. आपले विषय ईश्वर-प्रेमात व्यत्यय आणतात. ज्या ज्या गोष्टी या प्रेमाच्या आड येतात त्यांचा त्याग नको का करायला ? तेव्हा विषयांची आसक्ती, त्यांच्यावरचे प्रेम, नाहीसे झाले पाहिजे. आपण ईश्वराचे, संतांचे झाले पाहिजे. त्याशिवाय आपल्याला कशाचीही गरज वाटता कामा नये.

एकाच मातीचा जसा गणपती, बाहुले किंवा मडके होते, त्याप्रमाणे ईश्वरही आपल्या भावनेप्रमाणे होतो. म्हणूनच आपला भाव नेहमी शुद्ध आणि नि:स्वार्थी असावा. मुळाशी पाणी घातले की झाड वाढते, पण आपण मुळापर्यंत जातच नाही. तेव्हा, भाव शुद्ध कसा होईल ते पाहावे. उदाहरणार्थ, एकादशीच्या दिवशी उपवास करायचा एवढेच आपल्याला ठाऊक असते. पण एक गृहस्थ एकादशीला भगवंताचे नामस्मरण करायचे सोडून बारा वाजेपर्यंत अंघोळ न करता अंगण, मोरी झाडत बसला ! असे आमुचे चुकते. थोडक्यात म्हणजे, आपल्याला मुळात काय पाहिजे हेच कळत नाही. कावीळ झाली म्हणजे डोळ्याला खरे रूप कसे कळणार ? म्हणून, ज्याचे डोळे साफ आहेत तो सांगेल त्याप्रमाणे वागावे. याकरिता गुरु-आज्ञा प्रमाण मानून आपण वागत जावे. नाम श्रद्धेने आणि शुद्ध भावाने घ्यावे म्हणजे मनात शंका येत नाहीत. या भगवंताच्या नामाची गोडी एकदा लागली म्हणजे भगवंत नाही आपल्याला सोडीत. नामाशिवाय दुसरे सत्यच नाही अशी दृढ भावना झाली पाहिजे. जितकी देहबुद्धी अधिक तितके नाम अधिक घेतले पाहिजे. आज इतके दिवस आपण विषयाचे चिंतन केले, त्याने आपल्या हातात काय आले ? नामासारखे सोपे साधन नाही. प्रापंचिक लोक असे म्हणतात की, ''विषयाचा अनुभव तात्काळ येतो, पण भगवंताचा अनुभव हा अनुमानाचा आणि श्रद्धेचा आहे.'' हे त्यांचे म्हणणे मला पटते. प्रापंचिक लोक प्रपंच सोडीत नाहीत याचे मला नवल वाटत नाही. पण ते सुख चिरकाल टिकणारे आहे ही समजूत करून घेऊन त्यामध्ये रमतात, याचे मला वाईट वाटते. मी असे म्हणतो की, तुमच्या अनुभवाप्रमाणे जे खरे आहे, तेवढेच तुम्ही खरे माना. विषयाच्या ध्यासापासून सुख नाही असे वाटू लागले म्हणजे नामाची गोडी येईल. आपल्या देहावर आपली सत्ता नाही, आपल्या पैशावर आपली सत्ता नाही, आपल्या माणसांवर आपली सत्ता नाही. म्हणून आपले कर्तव्य तेवढे करावे, आणि ते करीत असताना आपले मन दुश्चित्त होऊ देऊ नये.

भगवत्प्राप्ती हे आपल्या जीवनाचे ध्येय ठरवून आपण नेहमी त्याच्याभोवती फिरत असावे; म्हणजेच त्याच्या अनुसंधानात असावे.



## शाळेची मज्जा...

अंकुश शिंगाडे,
नागपूर

### सहावं वरीस धोक्याचं ?

ज्योतिर्मय साहित्य

कॉन्व्हेंटच्या शाळा आल्या. यातही काही शाळा किस्तवार शुल्क आकारुन शाळा चालवतात. काही शाळा माफक शुल्क घेतात. काही मात्र जास्त. परंतू आज ते शुल्क कमी आहे. त्यातच त्यांची एवढी जाहीरात आहे की सर्व लोकं मग ते कितीही गरीब का असेना, कॉन्व्हेंटलाच टाकतात. त्यातच तो दिवस दूर नाही की सर्व पालक आपल्या पाल्यांना कॉन्व्हेंटला टाकतील व मराठीच्या शाळेत मुलंच मिळणार नाहीत.

महत्वपुर्ण गोष्ट ही लक्षात घेण्यासारखी आहे की आज मराठीच्या अनुदानीत शाळेत कितीही का असेना मुलं आहेत. परंतू ज्यावेळी मराठीच्या अनुदानीत शाळा बंद पडतील, त्यानंतर कॉन्व्हेंटच्या शाळेचं शुल्क एवढं भरमसाट वाढेल की गरीब लोकं आपली मुलं शिकवू शकणार नाहीत. ते आंदोलन करतील. परंतू त्याचा उपयोग होणार नाही. कारण तेव्हा वेळ निघून गेलेली असेल.

आज गरीबीचा आकडा व अनुदानीत शाळेत शिकणा-या विद्यार्थ्यांचा आकडा जास्त आहे. सरकार हा आकडा कमी व्हावा यावर वेळोवेळी प्रयोग करुन प्रयत्न करीत आहे. ती बाब आपल्या लक्षात येत नाही. कारण आपण विचारशील व्यक्तीमत्वाचे असलो तर तेवढ्या चिकीत्सक विचारसरणीचे नाही. सरकारनं याच व्यापारीक विचारानं पेन्शनवर कुऱ्हाड चालवली आणि हळूच शाळेच्या अनुदानावर. ब-याच दिवसापासून नान सॅलरी ग्रँडही बंद आहे. आर टी ई चे पैसे देवू केले. परंतू कोणत्याही शाळेला मिळाले नाही. हा व्यवहारीक बदल काय दर्शवतो? ही विचार करणारी बाब आहे.

विशेष गोष्ट अशी की आज जो पालक साक्षर आहे, त्याला सरकारचं नवीन शैक्षणिक धोरण कळत जरी असलं तरी तो आपल्याला काय करायचंय असा विचार करतो. जो अज्ञानी पालक आहे, त्याला या गोष्टी कळत नाही. जो अल्पशिक्षीत आहे, परंतू त्याचेजवळ भरमसाठ पैसा आहे, तो पालक चिकीत्सक जरी असला तरी तो विचार करतो की आपल्याला काय घेणंदेणं आहे. मरणं मात्र गरीबांचंच आहे.

विशेष गोष्ट ही की वय वर्ष सहा हा शाळा प्रवेशाचा आकृतीबंध पेन्शन बंदसारखाच आकृतीबंध वाटतो. काल पेन्शनधारकांची पेन्शन बंद झाली. उद्या गरीबांच्या शाळा बंद होतील यात शंका नाही. सरकार पुरेपूर स्वरुपात खाजगीकरण करण्यासाठीच लागलं आहे. ही निर्वीवाद सत्य बाब आहे. यामुळं वेळीच सावध व्हावे. नाहीतर तेल गेलं तूप गेलं, हाती धुपाटणं आलं अशी अवस्था देशातील गरीबांची निर्माण होवू शकते. ही शक्यता नाकारता येत नाही. वय वर्ष सहा, ही विद्यार्थ्यांचा विकास करण्यासाठी चांगली बाब आहे. परंतू ती बाब विचारात घेऊन सरकारनं पदड्यामागचं राजकारण करु नये. गरीबांच्या शाळा बंद करु नये म्हणजे झालं.



## आरोग्य संजीवनी

## शिंक आरोग्यास उपयुक्त

ज्योतिर्मय साहित्य

न सांगता, न थांबवता येणारी शिंक ही आरोग्यास फारच उपयुक्त आहे.

१) शिंकेमुळे हृदयाकडून मेंदुकडे व पोटाकडे अचानक जोराचा दाब दिला जातो, या दाबामुळे सर्वांगातील रक्तदाब जोराने झटका देऊन ढकलला जातो. याचा चांगला परिणाम रक्त प्रवाहावर होऊन रक्त वाहिन्या चांगल्या प्रकारे कार्यान्वित होतात व डोके हलके होते.

२) पुर्वी लोक शिंका येण्यासाठी नाकात तपकीर ओढून कृत्रिम प्रकारे शिंका आणत होते व डोके हलके करत होते.

३) आता शिंक येणे चुकीचे समजून लोक सॉरी म्हणतात, पण ती नैसर्गिक क्रीया आहे.

४) दैनंदीन जीवनात हृदयविकाराचे प्रमाण पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्ये कमी आहे, कारण स्त्रिया स्वयंपाक करतेवेळी किंवा घराची साफ सफाई करतेवेळी शिंकण्याचे कार्य सतत करत असतात. मात्र ज्या स्त्रियांचे शिंकण्याचे प्रमाण कमी आहे, त्यांची तब्येत अकारण स्थूल होते. शिंकेमुळे पोटावर प्रचंड दाब येतो व पोटाचे स्नायू आकुंचित केले जातात व त्यामुळे कपालभातीचा योग पूर्ण होतो.

५) नित्य नियमाने सकाळी उठल्यावर व रात्री झोपताना या दोन वेळेस शिंक येण्यासाठी उपाय केले तर शरीर सतत निरोगी तर राहतेच शिवाय पोटाचे व डोक्याचे दुखणे कायमचे बंद होते.

६) कृत्रिम शिंका येणेसाठी नाकात स्वच्छ धागा फिरवला तर शिंका सहज येतात, ह्यासाठी तपकीर वापरण्याची गरज नाही.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

७) शिंकेमुळे नाक व घसा सतत स्वच्छ राहतो, तसेच मनातील ताणतणाव कमी होतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे हृदयविकार होऊ नये ह्यावर देखील हा रामबाण उपाय आहे. निसर्ग उपचार पद्धती मध्ये ही क्रिया दिलेली आहे.

८) अभ्यास करतांना झोप येत असेल तरीही शिंका काढल्यास पुढील दोन तास डोके तरतरीत राहते व झोप येणे थांबते.

९) शिंकेमुळे चेहरा थोडासा लालसर होतो व डोळ्यात पाणी येते हे सुध्दा आरोग्यवर्धक आहे. चेहरा उजळतो व डोळे स्वच्छ होतात.

१०) शिंकेमुळे डोक्यातील विचार चक्र खंडित होते व पुन्हा नविन विचारचक्र सुरू होतांना मेंदुला नवचैतन्य निर्माण होते.

११) सतत सर्दी होत असेल तर ती शिंकांमुळे. काही काळाने अशी सततची सर्दी थांबते.

१२) अशा अनेक उपयुक्त बाबींशी शिंकांचा संबध आहे. अचानक येणारी व थांबवता न येणारी शिंक ही सजीवास ईश्वरी देणगीच आहे.



## ।। शिक्षण-संवाद ।।

अंकुश शिंगाडे,
नागपूर

### शिक्षण सर्वांनाच उपयोगाचं ?

ज्योतिर्मय साहित्य

त्यातूनच प्राणी कसे माणसाळवायचे. याही गोष्टी तो शिकला. ज्यातून त्यानं कुत्र्यावर विजय मिळवला. ज्यातून त्यानं हत्ती, वाघ, सिंह, अस्वल यावर विजय मिळवला. एवढंच नाही तर सापावरही विजय मिळवला. आज आपण पाहतो की जी गारुडी समाजाची मंडळी असतात. ते सापाला पकडून गळ्यात टाकतात. फाप पाळतात आणि साप विषारी असूनही त्यांना काहीच करीत नाहीत. त्थाचं कारण त्यांना अवगत असलेलं ज्ञान. जे आपल्याला नाही.

ज्या गोष्टीची गरज आपल्याला जेव्हा भासते. त्या गोष्टी मिळविण्यासाठी आपण प्रत्यक्ष प्रयत्न करतो व त्या गोष्टी मिळविण्यासाठी आपण प्रयोगही करतो. त्यासाठी निरीक्षण करतो. म्हणूनच त्या काळात लोकांना शोध महत्वाचे वाटले व जे शोध लावले गेले. ते निरीक्षणातून लावले गेले. ज्यासाठी आपल्या पुर्वजांना शाळेत जायची गरज नव्हतीच. आपलं मात्र त्यातील कोणत्याच शोधाकडे लक्ष गेलं नाही.

नवीन शैक्षणिक धोरण. यात जो अभ्यासक्रम बनवला. त्यात अशा शोधावरच जास्त भर दिल्या गेला. त्याचं कारण आहे, तंत्रज्ञ तयार करणे. हेच तंत्रज्ञ तयार व्हावेत म्हणून शासनानं नवीन शैक्षणिक धोरणात त्यासाठी वेगळा अभ्यासक्रम तयार केला. ज्यात प्रकल्प, नवोपक्रम व कृतीसंशोधनावर भर दिला. ज्यात प्रकल्प ही संशोधनाची पहिली पायरी आहे.


प्रकल्प...... प्रकल्प म्हणजे कोणत्याही प्रक्रियेत विशिष्ट उद्दीष्टे साध्य करण्यासाठी असलेले व्यावहारिक कार्य किंवा उपक्रम. यामध्ये लोकांना स्वशिक्षणाची संधी मिळते. तसेच त्यांच्या सर्जनशिलतेला वाव मिळतो. विश्लेषण कौशल्य आणि समस्या सोडविण्याच्या क्षमतेत वाढ होते. जो भाग बाल्यावस्थेपासूनच विद्यार्थ्यांना शिकवला जातो. ज्यातून शोध कसे लावावे लागतात. याची अनुभूती प्रकल्प माध्यमातून विद्यार्थ्यांना होते व ते साहजिकच शोधाकडे वळत असतात. हे सगळं बरोबर असलं तरी आज प्रकल्प म्हणजे काय हे बऱ्याच शिक्षकांना कळतच नाही. शिक्षणक्षेत्रात आजही असे बरेच शिक्षक आहेत की त्यांना साधा अर्ज कसा लिहायचा, तेही कळत नाही. काही शिक्षक स्वतः अपडेट व्हायला तयार नाहीत. ते स्वतःमध्ये बदलावच करीत नाहीत. ते शिकविण्यासाठी त्याच जुन्या परंपरागत शिक्षणाच्या पद्धती वापरतात. तसेच आज तंत्रज्ञानाचं युग असतांनाही बऱ्याचशा शाळेत ओव्हरहेड प्रोजेक्टर वापरत नाहीत. बऱ्याचशा शासकीय शाळेची अशीच गत आहे. काही खाजगी शाळेचीही हीच गत आहे. शाळा व्यवस्थापन करणारा व्यक्तीच तशा प्रकारच्या सोयीसुविधा शाळेला पुरवीत नाही. शिवाय प्रकल्प बनविण्यासाठीही थोडासा खर्च येतोच. तो खर्चही काही आईवडील करायला तयार नसतात. त्यामुळं शाळेत राबवल्या जाणाऱ्या उपक्रमावर अंकुश लागतो व त्याची परियंती विद्यार्थ्यांच्या अधोगतीत होतो.

(क्रमशः)

# जननायक बिरसा मुंडा

**ज्योतिर्मय साहित्य**

आज १५ नोव्हेंबर, भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांची जयंती. जननायक बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी रांची जवळील लिहती या खेडेगावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सुगमा मुंडा तर आईचे नाव करमी हातू असे होते. त्यांचे वडील शेतमजूर होते. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांना इंग्रजी माध्यमाच्या चाईबासा इंग्लिश मिशनिरी स्कुलमध्ये शिक्षणाची संधी मिळाली. इंग्रजी शिक्षणामुळे त्यांच्यावर आधुनिक विचारांचा प्रभाव पडला. बिरसा मुंडा हे जरी इंग्रजी शाळेत शिकत असले तरी त्यांना भारतीय संस्कृतीचा अभिमान होता. १८७८ – ७९ मध्ये ब्रिटिशांनी वन कायद्यात बदल केला. या नव्या कायद्यानुसार आदिवासींच्या ताब्यात असलेल्या जंगलांवर ब्रिटिशांची मालकी झाली. या कायद्यामुळे आदिवासींवर बेघर होण्याची वेळ आली. आदिवासींनी उदरनिर्वाहासाठी फळे, कंदमुळे, लाकुडफाटे अथवा जनावरांसाठी चारा तोडल्यास त्यांना शिक्षा होऊ लागली आणि आदिवासींच्या आस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला. या कायद्या विरोधात आदिवासींनी न्यायालयात दाद मागितली पण तिथेही त्यांना न्याय मिळाला नाही. १८८४ साली बिहारमध्ये भीषण दुष्काळ पडला. भीषण दुष्काळ आणि उपासमारीने अनेक लोक मरण पावली. जननायक बिरसा मुंडा यांनी या काळात आदिवासी समाजाची निः स्वार्थ सेवा केली. भीषण दुष्काळात लोक उपासमारीने मरत असताना लोकांप्रति संवेदना व्यक्त करण्याऐवजी जुलमी ब्रिटिश सरकारने अवाजवी शेतसारा आकारला. ब्रिटिशांनी आकारलेल्या अवाजवी शेतसऱ्याला जमीनदार आणि जहागिरदारांनी पाठिंबा दिला त्यामुळे चिडलेल्या बिरसा मुंडा यांनी जनआंदोलन उभारले. हे जनआंदोलन जहागीरदार व जमीनदारांच्या शोषणाविरुद्ध होते. आदिवासी बांधव मोठ्या संख्येने या जनआंदोलनात सहभागी होऊ लागल्याने हे आंदोलन दडपण्यासाठी जहागीरदार आणि जमीनदारांच्या माध्यमातून ब्रिटिशांनी बिरसा मुंडा यांना रोखण्याचा प्रयत्न केला. १८८५ साली बिरसा मुंडा यांना दोन वर्ष कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांना हजारीबागच्या तुरुंगात पाठवण्यात आले. तुरुंगात असतानाच त्यांनी जुलमी ब्रिटिश सरकार उखडून टाकण्याचा संकल्प केला. दोन वर्षांची शिक्षा भोगून आल्यावर त्यांनी आदिवासी समाजाला संघटित करून ब्रिटिश सरकार विरुद्ध लढा पुकारला. १८८७ मध्ये बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजाने ब्रिटिशांविरुद्ध अनेक लढाया करून त्यांना जेरीस आणले. या लढाया त्यांनी पारंपरिक शस्त्रांनी म्हणजे भाले, तलवारी, धनुष्यबाण यांच्या साहाय्याने लढल्या. आदिवासी, दुर्गम, डोंगराळ भागातून पारंपरिक पद्धतीने लढा उभारून त्यांनी ब्रिटिशांना सळो



की पळो करून सोडले. बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखालील आदिवासी समाज आपल्याला दाद देत नाही हे लक्षात आल्यावर ब्रिटिशांनी अतिरिक्त ८ कुमुक मागवली आणि आदिवासींवर हल्ला केला त्यात ४०० आदिवासी बांधव शहीद झाले. तरीही बिरसा मुंडा यांनी हार मानली नाही त्यांनी आपली लढाई चालूच ठेवली. १८९० मध्ये बिरसा मुंडा डोमवाडी पहाडात आदिवासी बांधवांना मार्गदर्शन करत असताना ब्रिटिश सैन्याने त्यांच्यावर हल्ला केला. भीषण लढाई झाली. बिरसा मुंडा यांना अटक करून रांचीच्या कारागृहात त्यांची रवानगी करण्यात आली. २० मे १९०० रोजी त्यांना एकांत कोठडीत ठेवण्यात आले.एकांत कोठडीत जेवण करण्यास त्यांनी नकार दिला त्यामुळे त्यांना अशक्तपणा आला. न्यायालयातच ते बेशुद्ध पडले. त्यांना न्यायालयातून कारागृहात आणण्यात आले औषध उपचार करण्यात आले त्यांची तब्येत सुधारली मात्र ९ जून १९०० रोजी त्यांना रक्ताची उलटी झाली ते बेशुद्ध पडले व त्यातच त्यांची प्राणज्योत माळवली. त्यांचा मृत्यू एशियाटिक कॉलरा या आजाराने झाला असे सरकारच्या वतीने सांगण्यात आले असले तरी त्या आजाराची कोणतेही लक्षणे त्यांच्या शरीरावर दिसत नव्हते त्यामुळेच इतिहासकार ब्रिटिशांनी त्यांची हत्या केली असा संशय व्यक्त करतात. नेपोलियनला जसे आर्सेनिक देऊन ठार मारले तेच लक्षणे बिरसा मुंडा यांच्या शरीरावर दिसत होते शिवाय त्यांना कारागृहातच दफन करून पुरावा नष्ट करण्यात आला. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात जननायक बिरसा मुंडा यांचे योगदान अतुलनीय असे आहे. आदिवासींच्या न्याय हक्कासाठी मोठा लढा उभारून त्यांनी जे महान कार्य केले त्याला तोड नाही त्यामुळेच त्यांना आदिवासी जननायक हा किताब जनतेने बहाल केला. आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे

# सादरीकरणातून शिकाल जीवन जगण्याची कला - जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** कलांचे सादरीकरण हे नेहमीच आत्मविश्वास आणि संधी देत असते. मात्र विविध प्रकारचे कलासादरीकरणातून आपल्याला जीवनात विविध प्रसंगांना सामोरे जाण्याची म्हणजेच जीवन जगण्याची कलाही आपण शिकत असतो, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले.

येथील देवगिरी महाविद्यालयातील रविंद्रनाथ टागोर सभागृहात आयोजीत बालआनंद उत्सव २०२५ च्या प्रसंगी जिल्हाधिकारी स्वामी उपस्थित होते. बालकांनी सादर केलेल्या विविध कलागुणांचे सादरीकरण त्यांनी पाहिले. जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्य) आश्विनी लाटकर, प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर, जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने, उपशिक्षणाधिकारी सीताराम पवार, श्रीमती सीमा मेहेत्रे आदी मान्यवर उपस्थित होते.





पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त साजरा केल्या जाणाऱ्या बालदिनानिमित्त जिल्हा परिषद शिक्षण विभाग (माध्यमिक) यांच्या वतीने दि.७ ते १४ नोव्हेंबर या कालावधीत शालेय विद्यार्थ्यांच्या स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमाचा आनंदोत्सव आयोजित करण्यात आला. आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय आणि राज्यस्तरावर शाळा आणि महाविद्यालयांमधून विशेष प्राविण्य प्राप्त केलेल्या विविध कला व क्रीडा प्रकारातील विद्यार्थ्यांचा गुणगौरव मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ८१ आंतरराष्ट्रीय,राष्ट्रीय आणि राज्यस्तरावर विशेष प्राविण्य प्राप्त, प्रज्ञावान व प्रतिभासंपन्न विद्यार्थ्यांचा सन्मानीत करण्यात आले. या कार्यक्रमाची सांगता आज सांस्कृतिक स्पर्धा व गुणगौरव सोहळ्याने झाली. या स्पर्धेत जिल्ह्यातील २९ शाळांच्या संघांनी सहभाग नोंदवला. यात समूह नृत्य, एकल नृत्य, नाट्य, गायन या सर्व कलाप्रकारांचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले. सूत्रसंचालन श्रीमती सुनीता वाघ, श्रीमती कविता रगडे, प्रवीण दाभाडे यांनी केले.

**सांस्कृतिक कार्यक्रम स्पर्धांचे निकाल–** समूह नृत्य–प्रथम क्रमांक – (वारकरी नृत्य) संत ज्ञानेश्वर विद्यालय निल्लोड फाटा, सिल्लोड, द्वितीय क्रमांक – (आदिवासी नृत्य) पी एम श्री जिल्हा परिषद तुर्काबाद खराडी ता. गंगापूर.तृतीय क्रमांक– (देशभक्तीपर गीत),आ कृ वाघमारे प्रशाला, छत्रपती संभाजीनगर. गीत गायन– प्रथम क्रमांक – राजे शिवाजी विद्यालय, वाळूज, पुनम चव्हाण, नाट्यः– प्रथम क्रमांक – जिजामाता विद्यालय, छत्रपती संभाजी नगर. वैयक्तिक नृत्यः– प्रथम क्रमांक– कार्तिकी चंदेल (लोकनेते साहेबराव पाटील विद्यालय शिल्लेगाव, तालुका गंगापूर) भारुड प्रकार– प्रथम क्रमांक नेहरू विद्यालय सावखेडा.., तालुका वैजापूर.

# दहशतवादाच्या उच्चाटनाचे आव्हान दिल्ली स्फोटाचा अन्वयार्थ

**ज्योतिर्मय साहित्य**

ऑपरेशन सिंदूर मुळे पाकिस्तानच्या दहशतवादाचे कंबरडे मोडले परंतु त्यानंतरही काही दहशतवादी गट सक्रिय होते, त्यांनीच नवी दिल्ली येथे लाल किल्ल्यासमोर स्फोटक दहशतवादी हल्ला घडविला. या दहशतवादाचे संपूर्ण उच्चाटन कसे करावे याचे हा एक जटिल प्रश्न बनला आहे. या अनुषंगाने सबंध जगातील लोकशाही राष्ट्रांनी एकत्र येऊन पाकसारख्या दहशतवाद पुरस्कृत करणाऱ्या देशाविरुद्ध जबरदस्त कारवाई करणे आवश्यक झाले आहे. कारण आता दहशतवादी गट सीमेवरून दूर जाऊन खैबर पखतून भागात नव्याने हालचाली करत आहेत त्यांचा संपूर्ण बीमोड कसा करावयाचा यासाठी नवी व्यूहरचना करणे क्रमप्राप्त आहे. भारताचे गृहमंत्री ना. अमित भाई शहा हे एक पोलादी पुरुष आहेत सरदार पटेल यांच्यानंतर त्यांच्यासारखा कणखर गृहमंत्री भारताला मिळालेला नाही, त्यामुळे ते आता आपल्या सर्व क्षमतांचा उपयोग करून या दहशतवादाचा बिमोड करण्यासाठी पुढे सरसावले आहेत या दहशतवादी हल्ल्याच्या निमित्ताने पाकिस्तानच्या छायायुद्धाचे (शाडोवारचे) एक नवे रूप पुन्हा एकदा समोर आले आहे त्यामुळे या घटनेचा अन्वयार्थ उलगडताना काही नवे पैलू प्रकाशात आणले पाहिजेत.

सतर्क गुप्तचर यंत्रणा :

गेल्या दहा वर्षात भारतावर झालेल्या दहशतवादी हल्ल्यांचे प्रमाण कमी झाले होते परंतु पहेलगाम नंतर आता पुन्हा दहशतवादी गट डोके वर काढत आहेत. देशभरात दहशतवादी गटांच्या हालचालीवर बारकाईने नजर ठेवण्यासाठी केले जाणारे गुप्तचर यंत्रणांचे प्रयत्न खरोखर प्रशंसनीय आहेत त्यामुळे फरीदाबाद येथे २९०० किलो स्फोटके जप्त करण्यात आली. याप्रकरणी संशयाची सुई तीन डॉक्टरांच्या दिशेने फिरत आहे. अनेक नवे धागेद्वारे समोर येत आहेत, आणि दहशतवादी नेटवर्क हे जैश ए मोहम्मदशी निगडित असल्याचे पुरावे समोर येत आहेत, यावरून असे दिसते की पाक मधील दहशतवादी यंत्रणा आपल्या कारवाया अद्यापही सातत्याने चालू ठेवत आहेत. दहशतवादाच्या बाबतीत शून्य सहिष्णुता हे भारताचे प्रखर धोरण असून, आता या धोरणाच्या अनुषंगाने आपणास दहशतवादाच्या विरोधात ठोस कारवाई करावी लागणार आहे. अशी कारवाई करताना रशिया, अमेरिका, चीन यासारख्या देशांचे सहकार्य सुद्धा घ्यावे लागेल, अनेक देश दहशतवादाच्या बाबतीत बोटचेपी आणि दुहेरी भूमिका घेतात. जेव्हा संकट त्यांच्यावर गुजरते तेव्हा ते जागे होतात. आणि भारतासारख्या देशावर संकट आले की मात्र गप्प का बसतात याचे खरे दुःख वाटते. आपल्या सर्व गुप्तचर यंत्रणांना सतर्क राहून दमदार पावले टाकावी लागणार आहेत.





डॉ. वि. ल. धारूरकर, पुणे
मो. ९२२५३१३५९२

(क्रमशः)

# उत्तर अमेरिकेतील निवडणूक निकालांचा अन्वयार्थ

**ज्योतिर्मय साहित्य**

**(मागील अंकावरून)**

आणखी काही कारणे

महापौर आणि राज्यपालाच्या निवडणुकीत ट्रम्प यांच्या पक्षाचा झालेला पराभव म्हणजे लोकशाही कडे जनतेचा कौल आहे तसेच रिपब्लिकन पक्षाचे पानिपत का व कसे झाले हे लक्षात घेता आणखी काही कारणे ही समजून घ्यावी लागतील उमेदवारांची अयोग्य निवड स्थानिक प्रश्नाकडे दुर्लक्ष प्रचाराच्या फळीतील एक सुरी आणि एककल्ली भूमिका बिघडलेली आरोग्य व शिक्षण व्यवस्था आणि महागाईने त्रस्त झालेली जनता यामुळे सत्ताधारी रिपब्लिकन पक्षाच्या पायाखालची वाळू घसरत आहे या सर्व राजकीय अनुभवातून ट्रम्प महोदय आणि त्यांचा सत्ताधारी रिपब्लिकन पक्ष काही धडे घेणार नसेल तर पुढील राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्ष सत्तेचा भवसागर ओलांडू शकणार नाही. आणि आपल्या चुकीच्या धोरणामुळे डोनाल्ड ट्रम्प महोदय डेमोक्रॅटिक पक्षाच्या पुनरागमनासाठी आपण होऊन वातावरण तयार करून देत आहेत. त्यामुळे त्यांच्या या उलट्या आणि उपराट्या धोरणाचा परिपाक म्हणजे डेमोक्रॅटिक पक्षाच्या पुनरागमनासाठी ही एक त्यांनी तयार करून दिलेली नामी संधी म्हटली पाहिजे. राजकारणात औषध एक जण घेतो आणि प्रकृती दुसऱ्याची सुधारते असे गणित असते. डोनाल्ड ट्रम्प पॅरिसचे औषध घेत आहेत आणि त्यांच्या मेगा धोरणाने अमेरिकेला महान राष्ट्र बनविण्याऐवजी ते सत्तेचा झोका डेमोक्रॅटिक पक्षाच्या दिशेने पुढे ढकलत आहेत. ट्रम्प औषधे घेतात आणि प्रकृती मात्र डेमोक्रॅट पक्षाची सुधारत आहे याला काय म्हणावे



समारोप

या सर्व चर्चेवरून हे स्पष्ट होते की अमेरिकेत उत्तरेकडील घटक राज्यात डेमोक्रॅटिक पक्षाने मिळविलेला अद्भुत विजय हा अनाकलनीय नव्हे तर तो काही निश्चित कारणामुळे घडून आला आहे या कारणांची मी मावसा हेच स्पष्ट करते की डोनाल्ड ट्रम्प यांनी आपली धोरणे बदलली नाहीत आणि त्यांनी जमिनीवर येऊन वास्तवात कृती केली नाही तर त्यांच्या पक्षाचा पराभव अटळ आहे पुढील राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाची दाळ पुन्हा शिजणार नाही आणि डेमोक्रॅटिक पक्षाच्या नेत्यांच्या व कार्यकर्त्यांच्या चेहऱ्यावर चेहऱ्यावर जे हसू दिसत आहे ते पुढील विजयाच्या दृष्टीने त्यांना एक नवी संधी दिसत आहे. त्यांच्या नभाच्या कडा पुन्हा उजळत आहेत आणि रिपब्लिकन पक्ष अंधाराच्या आणि वादळाच्या गर्तेत सापडत आहे पण ट्रम्प यांना आकाश ठेंगणे झाले आहे. आणि त्यांच्या तरी धोरणामुळे त्यांना आपली आणि बाप घरी दोन्ही ठिकाणी अंधार दिसत आहे तेव्हा अमेरिकेच्या उत्तर भागातील डेमोक्रॅटिक पक्षाचा विजय हा त्यांच्या ध्येयधोरणाचा जसा विजय आहे तसा तो ट्रम्प यांच्या विरोधातील जनमताचा एक एल्गार आहे हेच यावरून स्पष्ट होते पण या पराभवापासून ट्रम्प आणि त्यांचा पक्ष धडे घेणार की नाही हा खरा प्रश्न आहे नाहीतर त्यांचा पराभव आणि पतन अटळ आहे यात शंका नाही.


****




प्रा. डॉ. वि. ल. धारूरकर
ई-1108, कल्पतरू, ग्लोरिया ग्रेस, बावधन, पुणे मो. 9225313592











# शेतकऱ्यांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदला

ज्योतिर्मय साहित्य

गेल्या तिन-चार महिन्यात झालेल्या अतिवृष्टी मुळे शेतकरी, शेती, पिके आणि एकूणच परिस्थिती चे विदारक चित्र डोळ्यासमोर उभे आहे.शेतकरी हतबल झाला आहे. अनेक ठिकाणी दिवाळीपूर्वी तातडीची मदत दिली गेली बऱ्याच ठिकाणी ती मिळाली नाही म्हणून बातम्या वाचल्या आहेत. सरकारने मदत केली आहे. मुख्यमंत्र्यांनीच एकूण परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर म्हटले आहे की नुकसानीचे चित्र विदारक असून विचारापलीकडचे आहे. खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. इतकी नुकसान भरपाई देणे शक्य नाही.

निवडणुकीत निवडून आल्यावर सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते.

निवडणुकीनंतर कर्जमाफीचा तो विषय प्रलंबितच होता. योग्यवेळी कर्जमाफी केली जाईल असेही हे म्हटले होते. तेव्हा आता तरी शेतकऱ्याला सातबारा कोरा करण्याचे आश्वासन पूर्ण करा अशी मागणी मोठ्याप्रमाणात झाली. परंतु त्यावरही काही निर्णय नसल्यामुळे बच्चू कडूंनी आंदोलनाचा पवित्रा घेतला आणि शेवटी मुख्यमंत्री, व दोघांमध्ये चर्चा होऊन ३० जून पर्यंत कर्जमाफी करण्याचे आश्वासन दिले गेले. कर्जमाफी प्रक्रीयेला अजून सात ते साडेसात महिने अवकाश आहे. तोपर्यंत शेतकऱ्याला वाट बघणे हेच नशिबात आहे. एक एप्रिल पासून शेतकऱ्यांना नवीन खरीप कर्ज वाटप सुरू होते. ३० जून पर्यंत कर्जमाफी प्रक्रिया पार पडल्यास त्यांना नवीन कर्ज मिळू शकते. नविन कर्ज मिळण्यासही विलंब लागणार आहे. तोपर्यंत पेरणीची वेळ येते. त्यामुळे मशागतीसाठी बी बियाणे खतासाठी त्याला पैसा उभा करणे ही समस्या आहेच.

गेला अनुभव बघता बऱ्याच अंशी पीक विमा रकमा मिळाल्या नाही. नियमित कर्ज भरणाऱ्यांना प्रोत्साहन पर रक्कम मिळाली नाही. बऱ्याच ठिकाणी दह- वीस रुपये पन्नास रुपये अशा विम्याच्या रकमा मिळालेल्याच्या बातम्या आपण वाचल्या आहेत आणि त्याबाबत अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. एकूणच शेतकऱ्याकडे, त्यांच्या समस्येकडे, प्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टिकोन एवढा गंभीरपणे घेतला जात नाही. शेतकऱ्याची केवळ थट्टा केली जात आहे.तोंडसूख घेतले जात आहे. असेच दिसते.

अनेक प्रकारात शेतकऱ्यांचे जखमेवर मीठ चोळल्या जात आहे. ज्याच्या जीवावर अगदी गाव पातळीपासून सहकारी सोसायटी, सहकारी बँका, सहकारी साखर कारखाने, सूतगिरण्या, असे अनेक प्रकल्प उद्योग सुरू आहे अशा मुख्य घटकाकडेच प्रामुख्याने दुर्लक्ष होत आहे.

गेल्या काही वर्षात शेतकरी विषयी काय काय बोललै गेले.. शेतकरी दारु पितात, कर्जाची रक्कम घरातच लग्नकार्यात खर्च करून टाकतात,

कितीही भाव दिला तरी रडतात साले- तुमच्या अंगावरचा कपडाही तुमच्या बापाने दिला आहे- ढेकळाचे पंचनामे करायचे का?

कर्ज घ्यायचं ते थकवायचं परत कर्जमाफी मागायची, परत कर्ज घ्यायचं, परत माफी मागायची, हाच शेतकऱ्याचा उद्योग होवून बसलाआहे..असे राधाकृष्ण विखे पाटील, म्हणतात. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तर कळसच गाठला आहे. शून्य दराने कर्ज देत आहे ते नीट भरा काय माफ माफ फ ुकटात फुकटात लावला आहे. एकदा साहेबांनी माफी केली देवेंद्रजींनी माफी केली एकदा उद्धव सरकारने माफी केली अजून कितीदा माफी हवी. अशाप्रकारे शेतकऱ्या विषयी भावना व्यक्त केल्या आहेत. आम्हाला निवडून यायचे होते म्हणून मग आम्ही कर्जमाफी करू अशी आश्वासन दिले. दिले आहे नं, मग आता



आश्वासन पूर्ण करा पण त्यासाठी काही हजार कोटी रुपयांची आवश्यकता असते. एकूणच त्यांच्या मनात शेतकऱ्या विषयी काय सहानुभूती आहे हे स्पष्टच होते. शेतकऱ्यांनी आर्थिक शिस्त लावावी असा सल्ला ते शेतकऱ्यांना देतात.

पण आता या चार-पाच दिवसात जे काही घडत आहे त्यावरून आता जनता त्यांना जाब विचारत आहे. आता तुम्हाला फुकट फुकट आणि स्टॅम्प ड्युटी माफ हवी होती का? ती होईल का? २१०० कोटीची जमीन ३०० कोटींना हवी आणि स्टॅम्प ड्युटी पाचशे. अशां फ ुकट्यांना शेतकऱ्यांविषयी बोलण्याचा काय अधिकार आहे ?शेतकरी वर्गात संतापाची लाट उसळली आहे. शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी अजित पवारांच्या राजिनाम्याची मागणी केली आहे. निवृत्त न्यायाधीशामार्फत चौकशी करायची मागणी केली आहे.

मुख्यमंत्र्यांनी कर्जमाफीचा निर्णय घेतल्यानंतर आता परत परत कर्जमाफी होणार नाही काही हजार द्यायला लागतात. असे भाष्य करण्याची काही आवश्यकताच नव्हती.


जमीन प्रकरणात राष्ट्रवादीचे प्रवक्ते अमोल मिटकरी म्हणतात पार्थला काही झाले तर हे सरकारच कोसळेल. या वक्तव्यावरून त्याची प्रवक्ते पदावरून हकालपट्टी झाली. वास्तविक पाहता पंतप्रधान आणि मुख्यमंत्री यांचे खूप मोठे उपकारच अजित पवारांवर आहे आणि असे असताना आपले तत्व सोडलेले नाही आणि राज्याच्या विकासासाठी मी सरकारमध्ये आलो असे म्हणतात, कितपत सत्य आहे हे सगळे ? राष्ट्रवादीला सरकारमध्ये घेऊ नये असे म्हटले होते, असे मोहनजी भागवत यांचे वक्तव्य सोशल मीडियावर प्रसिद्ध झाले ते वाचण्यात आले. सोशल मीडियावर आजकाल खूप काही बातम्या प्रसिद्ध होत असतात अर्थातच ते जर म्हणाले असतील तर त्यातील सत्यताही नाकारता येत नाही. आपली सोडवणूक करून घेण्यासाठी आणि सत्तेचा उपयोग करून पक्ष वाढीसाठी बरीच मंडळी भारतीय जनता पक्ष प्रवेश करत आहेत.

आता मागच्या आठवड्यात कर्ज माफी विषयी निर्णय घेतला आणि ३० जून पर्यंत कर्जमाफी करणार जाहीर केले. खरीप हंगाम कर्ज भरण्याची अंतिम ३१ मार्च २०२६ आहे. म्हणजे ते कर्ज त्या दिवशी थकबाकी होणार मग आता ३१ मार्च २०२६ कोणीही शेतकरी ते भरणार नाही. म्हणजे याचा अर्थ आज की ३१ मार्च २५ रोजी ज्याच्याकडे थकबाकी कर्जआहे ते माफ होणार. असाच सरळ अर्थ होतो आणि ३१ मार्च रोजी ज्याच्याकडे कर्ज बाकी आहे ती कर्ज बाकी तीन लाखापर्यंत माफ होणार हीच अपेक्षा सर्वांना आहे.

मागच्या काळात ज्या नियमित कर्जदारांनी कर्ज भरून टाकले त्यांना प्रोत्साहन म्हणून पंचवीस हजार किंवा पन्नास हजार रुपये देणार जाहीर करून दिले नाही. त्यामुळे आता खरीप हंगाम वाटप कर्ज ३१ मार्च रोजी कर्ज कोणी भरणारच नाही आणि ते थकीत होणार हे साहजिकच आहे आणि त्यामुळे ३१ मार्च थकीत कर्ज आहे ते ते माफ होण्याची अपेक्षा शेतकऱ्याला असणार.

खरंतर आता या दोन गोष्टींची गरज आहे एक म्हणजे राजकीय नेत्यांनी शेतकऱ्यांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलायला हवा आणि दुसरे असेही शेतकऱ्यांनीही राजकीय नेत्यांकडून अपेक्षा ठेवून राहण्यापेक्षा आपल्या हक्कासाठी झगडणे पसंत करावे.त्यासाठी शेतकरी संघटना मजबूत असायला हवी.

कारण सध्या राजकीय पक्ष निहाय शेतकरी विभागणी आहे हा भाजपाचा, हा राष्ट्रवादीचा, हा शिवसेनेचा, हा उबाठा चा, हा काँग्रेसचा, अजूनही त्यातही मराठा समाजातील शेतकरी, हा कुणबी समाजातील शेतकरी, लेवा पाटील शेतकरी, हा ब्राह्मण शेतकरी, म्हणजे झालं असं की शेतकरी सुद्धा पक्ष




आणि जातीनिहाय विभागाला गेला आहे. विदर्भातील शेतकरी मराठवाड्यातील शेतकरी पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी उत्तर महाराष्ट्र शेतकरी अशाप्रकारे विभागले आहे.

त्यामुळे त्यात एक संघटन नाही. शेतकरी संघटना आहे. त्यातही निरनिराळे विचार प्रवाह आहेत. त्यामुळे तेही एक मजबूत संघटन नाही आणि म्हणूनच शरद जोशी शेतकऱ्यांचे मोठे नेते म्हणून जरी कार्य केले असले तरी ते निवडणुकीत पराभूत झाले.जातीय समिकरणाने त्यांना राजकीय क्षेत्रात स्विकारले नाही असेच म्हणावे लागेल.

मशागती पासून ते उत्पादित पीक घरात येऊन त्याची विक्री होऊन पैसा शेतकऱ्या हातात येईपर्यंत जी सिस्टीम आहे त्यात अमलाग्र बदल होणे आवश्यक आहे ही गोष्ट वारंवार समोर येत आहे. आणि या व्यवस्थेत होणाऱ्या त्रासामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणावर होत आहे.

सहज कर्जाची उपलब्धता, बियाणे, खते, ची उपलब्धी, त्यातील भ्रष्टाचार, भेसळ थांबवणे, उत्पादित मालाला हमीभाव देणे, शेती साठी असणाऱ्या योजना व्यापक करणे. अनेकदा योजनांमध्ये अनुसूचित जाती जमाती शेतकऱ्यांसाठी असलेल्या योजनात लाभधारक नसतात. तेव्हा अशा योजना जसे शेततळे, विहीर खोदायी ,जुन्या विहिरीचे दुरुस्ती, यासाठी दिले जाणारे अनुदान योजना दहा एकर पर्यंतच्या शेतकऱ्यांसाठी व्यापक प्रमाणावर राबवली जावी. त्या शेतकऱ्यांना ही योजना का लागू होत नाही ? यासंबंधी विचार करावा आणि अनुदान उपलब्धी करून द्यावी. त्यासाठी जाती वर्गाचे बंधन नसावे. थोडक्यात शेतकऱ्याच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी ज्या काही योजना आहेत त्यात व्यापकता आणणे गरजेचे आहे. केवळ ठराविकच लोकांना याचा लाभ मिळवून दिला जातो असे होवू नये.

आज ज्या प्रकाराने शेतकऱ्याला लाचार समजून अपमानास्पद बोलून नाउमेद केले जाते हे थांबायला हवे. शेतकऱ्यांन कडे बघण्याचा, बोलण्याचा दृष्टिकोन बदलायला हवा. आज तुम्ही बोलता आणि उद्या तुमच्या खाली फटाका फुटतो.जे जे बोलता त्यांनी आत्मचिंतन करा. आपली वाणी बिघडू देवू नका.

बळीराजाने नाही केला पेरा...तर काय खाल..?अशी वेळ येवू देवू नका...हेच तुम्हाला सांगणे आहे.

तूर्तास एवढेच.

# स्थानिक गुप्तचर प्रमुख - नाकी महंमद

ज्योतिर्मय साहित्य
**(मागील अंकावरून)**

आझाद हिंद सेने च्या फौजेवर इंग्लंड - अमेरिका सैनिकांनी हवाई हल्ला, जमीनीवरून जोरदार हल्ला केला असता. जपानी-आझाद हिंद सेनेला रसद न मिळाल्यामुळे अतीशय कठीण परिस्थितीत रंगून पर्यंत माघार जुलै १९४४ मध्ये घ्यावी लागली. पण यापूर्वी २ जुलै १९४४ रोजी नेताजी यांनी मणिपूर आघाडीवर चुराचांदपूर नावाच्या गावाला भेट दिली होती. साईकोट नावाच्या गावात राहणारे कोलबेल नावाचे राजे यांनी नेताजी यांचे आदरातिथ्य केले होते. साईकोट गावाच्या वरच्या बाजूच्या टेकडीवर आझाद हिंद सेनेची एक मोठी छावणी होती. नेताजी त्या छावणीची पाहणी करण्यासाठी आणि सैनिकांना भेटण्यासाठी आले होते. त्यानंतर त्यांनी स्थानिक लोकांच्याही भेटी घेतल्या होत्या. नेताजी लष्करी गणवेशात होते. त्यांनी एका बाजूला मागे एक लहान पिस्तूल अडकवलं होत तर दुसऱ्या बाजूला एक तलवार लटकत होती. संध्याकाळी ७ वाजता नेताजी कोलबेल या राजाच्या बागेतल्या मोठ्या झाडाखाली बसले. गावकऱ्यांनी मोठ्या काळजीपूर्वक ते झाड अजून जतन केलं आहे. मणिपूरमध्ये टोळ्यांमध्ये गावाच्या मुख्याला राजा असे संबोधण्याची पध्दत आहे. आझाद हिंद सेनेचे सैनिक इथं आल्यापासून बरेच दिवस इथली स्थानिक गावं त्यांना आवश्यक तो शिधा पुरवत आहेत हे आपल्याला माहित असल्याचं नेताजींनी कोलबेल यांना सांगितलं. भारत स्वतंत्र झाल्यावर मी तुमचं हे औदार्य विसरणार नाही असे सांगत नेताजींनी एका कागदावर आभार व्यक्त करणारा मजकूर लिहून कोलबेल यांना दिला. मात्र ही चिठ्ठी ब्रिटिशांच्या हातात पडली तर त्याचे-वाईट परिणाम तुम्हाला भोगावे लागतील असा इशाराही नेताजींनी कोलबेल यांना दिला. आझाद हिंद सेनेने माघार घेतल्यानंतर कोलबेल यांनी इतर काही वस्तूंच्या जोडीनं ती चिठ्ठी एका पेटीत बंद केली आणि ती पेटी जवळच्या जमिनीत पुरली. पुढे त्या पेटीत पाणी झिरपलं आणि ती हस्तलिखित चिठ्ठी खराब झाली. तीन ते चार महिने आझाद हिंद सेनेच्या आगमनामुळे आणि त्यांनी दिलेल्या स्वातंत्र्याच्या संदेशामुळे मणिपूरच्या बऱ्याचशा भागात चैतन्य संचारलं होतं. मणिपूरचा संपूर्ण दक्षिण भाग म्हणजे कमीतकमी १० ते १२ हजार चौरस किलोमीटरचं क्षेत्रफळ नेताजी यांच्या सैन्याच्या अधिपत्याखाली होतं.

मोईरांगला १४ एप्रिल १९४४ रोजी ध्वज फडकावल्यानंतर ''आझाद हिंद सरकार'' अंतर्गत पहिले मुक्त प्रशासकीय युनिट घोषित करण्यात आले. कर्नल शौकत मलिक यांनी नाकी महंमद यांना स्थानिक आझाद हिंद फौज तळ प्रमुख म्हणून नेमले. त्यांच्या मदतीने मणिपूरमधील मैतेई, नागा आणि कुकी समाजातील तरुणांना आझाद हिंद सेनेत भरती करण्यात आले. अनेक स्थानिक स्त्रीया केन्या, मुथुम, रंधोनी आदि झाशी रेजिमेंट मध्ये सामील झाल्या. ज्याचे नियोजन नाकी महंमद आणि कर्नल शौकत मलिक यांनी मिळून केले. दोघांनी मिळून आझाद हिंद सेनेच्या पथकाच्या मार्फत ब्रिटिश व अमेरीकन सैन्याशी अनेक संघर्ष केले. मोइरांगपासून इम्फाळपर्यंत पसरलेल्या सैनिकी मोर्चावर त्यांनी दोन महिने नियंत्रण ठेवले. अमेरिकन एअर फोर्स



ने मदत करेपर्यंत ब्रिटिशांना मोईरांग पुनःप्राप्त करणे शक्य झाले नाही. नाकी महंमद यांनी स्थानिक रहिवाशांमध्ये प्रचारकार्य, पुरवठा व माहिती गोळा करण्याची जबाबदारी घेतली. त्यांच्या सहाय्याने ब्रिटिश तळांविषयी नेमकी माहिती मिळाली. ज्यामुळे सैनिक हल्ले प्रभावी ठरले. याच काळात नाकी महंमद यांना स्थानिक गुप्तचर प्रमुख हे पद बहाल करण्यात आले.

ब्रिटिशशाशित प्रदेशात एका कामगिरीवर असताना नाकी महंमद पकडले गेले.त्यांना अटक करून दिल्लीच्या लाल किल्ल्यात नेण्यात आलं आणि दुसरे महायुद्ध संपेपर्यंत पंजाबच्या मुलतान तुरुंगात बंदीवान म्हणून ठेवण्यात आले. नाकी महंमद यांना ब्रिटिश लष्करी गुप्तचर विभागाने ''जपान समर्थ बंडखोर '' या श्रेणीत ठेवले आणि त्यांची चौकशी केली. या काळात त्यांची विचारपूस ब्रिटिश अधिकारी मेजर विल्यम्स आणि कर्नल हॉल यांनी केली. त्यांच्याकडून ''नेताजींचे आदेश'', आयएनए () चे संघटन आणि जपानी संपर्क याबाबत माहिती घेतली गेली. नाकी महंमद यांच्या साक्षीने त्यांच्या वर्तनातील शिस्त, नेताजी यांच्याप्रती निष्ठा आणि भारत देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढल्याचा ठाम दावा इंग्रजांना हादरवून गेला. १९४५ च्या नोव्हेंबरमध्ये ब्रिटिशांनी निर्णय घेतला की आझाद हिंद फौजेवरील सैनिकांवर खुल्या न्यायालयात खटले चालवायचे, जेणेकरून भारतीयांवर भय निर्माण होईल. हे तथाकथित ''लाल किल्ल्याचे मुकदमे '' म्हणून ओळखले गेले. प्रमुख आरोपींमध्ये शाहनवाज खान, प्रेम सहगल आणि ढिलाँ यांच्यासह इतर काही अधिकाऱ्यांवर आरोप ठेवण्यात आले. नाकी महंमद यांचे नांव दुसऱ्या खटल्याच्या साक्षी दस्ताऐवजांमध्ये आहे. जे आयएनए () ची स्थानिक नेतृत्वश्रेणी म्हणून ओळखले जाते. नाकी महंमद यांनी न्यायालयासमोर स्पष्ट सांगितले... ''मी माझ्या देशासाठी झटत आणि लढत होतो. गुलामगिरीविरुद्ध लढणे देशद्रोह कसा होऊ शकतो?''. या वक्तव्यानंतर अनेक भारतीय राष्ट्रवादी त्यांच्या समर्थनार्थ उभे राहिले. या खटल्यांदरम्यान भारतभर तीव्र आंदोलन झाले, ज्यात काँग्रेस, मुस्लिम लीग आणि कम्युनिस्ट पक्षही सहभागी झाला होता. ब्रिटिश व्हाईसरॉय लॉर्ड वावेल यांनी अखेर भारतीय जनमताच्या दबावाखाली सर्व आझाद हिंद सेनेच्या सैनिकांना टप्प्याटप्प्याने मुक्त करण्याचा निर्णय घेतला. नाकी महंमद १९४६ मध्ये मुक्त झाले आणि मणिपूरला परत गेले.

नेताजींच्या नेतृत्वाखाली अनेकदा रणनीती सल्लामसलतीत सहभागी झालेल्या नाकी महंमद यांना नेताजींच्या विमान दुर्घटनेची बातमी ते ब्रिटिशांच्या कैदेत असताना समजली. नाकी महंमद हे आजीवत त्यांच्या तत्वांशी एकनिष्ठ राहिले. नेताजी आझाद हिंद सैनिकांच्या एका बैठकीत म्हणाले होते... आपण सर्व भारतीय आहोत. धर्म आपल्या आत्म्याचा भाग आहे पण देश आपल्या प्राणाचा.'' हे विधान त्यांनी आपल्या अंतीम क्षणापर्यात लक्षात ठेवले. त्यांनी उत्तरपूर्व भारतात नेताजींच्या सैनिकांसाठी स्मृतीकार्य सुरू केले आणि ''नेताजी आमचा धर्म आहेत'' असे विधान केले होते. कर्नल शौकत मलिक आणि नाकी महंमद हे अत्यंत जवळचे मित्र होते. भारताच्या फाळणीनंतर शौकत मलिक यांचं घर पंजाब प्रांतात दक्षिणेकडे बहावलपुर येथे असल्याने व हा भाग पाकिस्तानात गेल्याने तिकडेच राहिले. त्यांनी नाकी महंमद यांच्याशी संपर्क साधून त्यांना पश्चिम पाकिस्तानात नोकरी देऊ केली. मात्र त्यांनी नोकरी नाकारून मणिपूरमधल्या आपल्या



शिरीष चिटणीस
सातारा मो. 75888 65051

मूळ गावी शिपाई पदाची नोकरी करीत स्वातंत्र्यानंतर आझाद हिंद सेनेच्या () स्मृती जतन करण्यासाठी तसेच स्थानिक क्रांतिकारकांचे दस्ताऐवजीकरण करण्यासाठी कार्यरत राहिले. त्यांनी मणिपूर आझाद हिंद मेमोरियल समिती स्थापन केली आणि स्थानिक इम्फाळ संग्रहालयात कर्नल शौकत मलिक यांच्यासह जे जे स्वातंत्र्यलढ्यात सैनिक म्हणून सहभागी होते त्यांची नावे समाविष्ट केली.

मोहरंगला आयएनए च्या स्मरणार्थ एक आकर्षक इमारत बांधण्यात आलेली असून त्यामध्ये एक युद्ध संग्रहालय, एक सार्वजनिक वाचनालय, एक प्रेक्षागृह आणि ऑगस्ट १९४५ मध्ये सिंगापूरच्या समुद्रकिनाऱ्यावर बांधलेल्या आयएनए हुतात्मा स्मारकाची प्रतिकृती एवढ्या गोष्टी आहेत. एका सुरेख बागेत सिंगापूर येथे वसवलेलं हे हुतात्मा स्मारक बांधल्यानंतर पंधरा दिवसात ब्रिटिशांनी डायनामाईट लाऊन उडवून दिलं. स्मारकाच्या प्रतिकृतीवर मूळ स्मारकाप्रमाणेच आझाद हिंद सेनेचं ब्रीदवाक्य कोरलेले आहे.... इतमद (श्रध्दा), इत्तफाक (एकता) आणि कुर्बानी (त्याग). स्मारकाच्या समोरच नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा ब्रान्झचा पुतळा आहे. नेताजींनी सिंगापूर इथं आझाद हिंद सेनेच्या हंगामी सरकारची घोषणा २१ ऑक्टोबर १९४३ रोजी केली होती. हाच दिवस म्हणजे २१ ऑक्टोबर १९७२ रोजी त्यावेळचे राष्ट्रपती आणि ख्यातनाम स्वातंत्र्य सैनिक व्ही.व्ही.गिरी यांच्या हस्ते या म्युझियमचे उद्घाटन करण्यात आले.

नेताजींच्या अधिकृत मुद्रणपत्रात असे म्हटले गेले आहे कि, (आझाद हिंद सेना) चा झेंडा मोईरांग मध्ये जो फडकला, तो फक्त विजयाचा नाही तर हिंदू-मुस्लीम-शिख-ख्रिस्ती ऐक्याचा प्रतीक ठरला.'' त्या विजयात कर्नल शौकत मलिक आणि नाकी महंमद ( नाकी अहमद चौधरी) यांचा समन्वय हा भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासातील अमर अध्याय आहे. नाकी महंमद (नाकी अहमद चौधरी) यांचा जन्म १९१४ मध्ये मणिपूर-भारतातील केइखू गावात झाला होता. ९ डिसेंबर १९९६ रोजी त्यांचे निधन झाले. लाल किल्ल्यातील कैदेतील त्यांचा अनुभव हा आझाद हिंद फौजेच्या सैनिकांच्या शौर्याचा साक्षीदार ठरला आणि भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील एका सामूहिक स्मृतीचा भाग बनला.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559